
# Visual MELODY

E-Magazine about Visual Arts in free India
By: RAVI PARANJAPE FOUNDATION FOR ART

*Volume 3 - Quarterly Issue 1 - January 8, 2022*




## COVER STORY
Eminent Indian Cartoonist
**Shri. S.D. Phadnis**

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged. All images © Mr. S. D. Phadnis




Eminent Indian Cartoonist

# Shri. Shi. Da. Phadnis

Special Issue

**Editorial Director -** Rahul Deshpande
**Designer -** Sunil Gokarn
**Article Contributor -** Roopa Deodhar
**Translator -** Nandini Bajekal



“If the art of cartooning had not challenged my creativity as an artist, I would have pursued painting”

**- Shi. Da. Phadnis**



ते वर्ष होतं १९४४. कोल्हापुरातल्या मध्यमवर्गीय घरातील एक तरुण. चित्रकलेच्या ओढीनं जबरदस्त झपाटलेला. मॅट्रिकनंतर शिक्षण घ्यायचं ते मुंबईच्या विख्यात सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधूनच हा ध्यास घेतलेला.

त्या ध्यासामागे पार्श्वभूमीला होते, अगदी लहानपणी घरात तासंतास पाहिलेले चित्रमयजगतचे अंक, कोल्हापूरच्या रंकाळा, मंडई, कपिलतीर्थ परिसरात मित्रांबरोबर केलेली असंख्य स्केचेस, तसंच शिंदे मास्तरांच्या मार्गदर्शनाखाली मिळवलेली इंटरमिजिएट परीक्षेतली राज्यस्तरावरची तीन पारितोषिकं. घरात कलाशिक्षणाबद्दल कोणालाच फारशी माहिती नव्हती. पण मोठ्या भावानं - बापूनं - घरच्यांना समजावलं आणि हा तरुण दूरच्या, अवाढव्य, अनोळखी मुंबईत दाखल झाला.

## शि. द. फडणीस हे ते नाव.

**माझे आणि लीनाचे बाबा!**

**- रूपा देवधर.**

जिद्दीनं ते चित्रकला शिक्षणासाठी मुंबईत आले. कमर्शिअल आर्टचं शिक्षण उत्तमप्रकारे पूर्ण करून १९४९ मध्ये पदविका घेतली. एकीकडे मुंबईत इंग्रजी / मराठी नियतकालिकांमधली हास्यचित्रं पाहण्यात येत होती. काम करता करता छंद म्हणून हास्यचित्रं काढायला त्यांनी सुरुवात केली. सुरुवातीला फक्त छंद असणारी ही कला आपलीशी केली, वाढवली आणि त्या कलेला एक उंची प्राप्त करून दिली.

हास्यचित्रांत त्यांनी अनेक प्रयोग केले, हास्यचित्रं ही फक्त पानपूरकं किंवा क्षणभर हसविण्यासाठी नसून, ती एक गंभीरपणे घेण्याची कला आहे, हे वैविध्यपूर्ण कामांतून दाखवलं.

त्यांनी स्वतःच एके ठिकाणी लिहिलं आहे - **' हास्य चित्रकला जर उथळ असती, चित्रकाराला - त्याच्या सृजनशक्तीला आव्हान देणारी नसती, तर मी हास्यचित्रांच्या वाटेला मुळीच गेलो नसतो. मी पेंटिंगकडे वळलो असतो.'**





## शि. द. फडणीस यांची चित्रं कशी असतात?


हा प्रश्न विचारला तर पटकन उत्तर येईल - **‘एकदम छान. पाहिल्याबरोबर हसू येतं. प्रसन्न वाटतं. चित्रं लगेच कळतात. सोपी असतात.’**

पण जसजसे आपण त्यांच्या चित्रांकडे नीट पाहायला लागतो, अनेक वर्षांच्या कामाचं निरीक्षण करतो, तेव्हा या **‘छान - प्रसन्न - सोपं’** चा अर्थ कळायला सुरुवात होते. ती सोपी नाहीत हे कळतं.

## ड्रॉइंग आणि ॲनाटोमीवरचं प्रभुत्व:

त्यांच्या चित्रातले मला प्रभावित करणारे घटक म्हणजे त्यांचं रेखांकनावरचं प्रभुत्त्व, प्रत्येक चित्रात असलेला विचार आणि या मोठ्या रंगीत चित्रांतली अद्भुतता!

मनातल्या कल्पना चित्रात उतरविण्यासाठी त्यांनी पात्रांना हवं तसं वळवलं - वाकवलं - उभं केलं आहे. तरीही कोणत्याही स्थितीत ती पात्रं विचित्र, बेढब वाटत नाहीत. याचं कारण **ड्रॉइंग आणि ॲनाटोमीचा** अभ्यास, कोल्हापूर - जेजे स्कूलपासूनचे सराव आणि परिपूर्णतेचा ध्यास.



हसवणूक, नोव्हेंबर १९७४.
फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी येथे प्रदर्शित - २००६.



मोहिनी, डिसेंबर १९५६



# असंख्य स्केचेस:

मुलगी म्हणून मी अगदी जवळून पाहिलं आहे आणि ग्राफिक डिझायनर म्हणून ज्याचं महत्त्व जाणवलेलं आहे, अशी गोष्ट म्हणजे ते प्रत्येक चित्रावर घेत असलेली मेहनत!

कल्पना कागदावर नेमकी उतरवण्यासाठी ते असंख्य स्केचेस करतात. पेन्सिलमध्ये वेगवेगळ्या रचना करून बघतात. पात्रांची चित्रांमधली रचना, त्यांची कृती, चेहऱ्यावरचे भाव - हे आजमावण्यासाठी ही स्केचेस असतात.

हे सर्व योग्य तऱ्हेनं कागदावर उतरलं आहे ना, हे आईला/ आम्हाला विचारून खात्री करतात. त्यामुळे त्यांच्या सर्व मानवाकृतींमध्ये एक मोहक लय असते, वेग असतो, हालचाल असते.

**'दुधाचं पातेलं हातात घेतलेलं मांजर'** या चित्रात दबकत आलेल्या मांजराच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव जमण्यासाठी त्यांनी किती स्केचेस केली होती, ते मला चांगलं आठवतंय.

स्केचेसनंतर ते रंगसंगतीसाठी छोटी छोटी थंबनेल्स करतात. आता त्यांच्या मनात, डोक्यात ते चित्र पूर्ण झालेलंच असतं. फक्त ते मोठ्या कागदावर उतरवण्याची कृती शिल्लक राहते. तेही काम ते तब्येतीत, मनापासून आनंद घेत करतात आणि त्यात व्यावसायिकताही जपतात. ठरलेल्या तारखेच्या दोन दिवस आधी चित्र पूर्ण होऊन पाकिटात बांधून तयार असतं. व्यावसायिक चित्रकारितेच्या जगात ही गोष्ट किती दुर्मिळ आहे हे त्या क्षेत्रातील लोकांना सांगायला नको!




चेहेऱ्यावरील हावभावांचा सराव करण्यासाठी स्केचेस. (१९६२-६३)

मोहिनी, नोव्हेंबर १९६७



स्केचबुकातले चित्र आणि अंतिम चित्र.







# शैलीत होत गेलेला बदल:

हे सर्व अनेक वर्षं करत असताना त्यांच्या शैलीमध्ये आकर्षक बदल होत गेले. ती गोठलेली राहिली नाही. सुरुवातीला ५० - ६० च्या दशकात जवळजवळ वास्तववादी असणारी चित्रं नंतर विशिष्ट शैलीत होऊ लागली.

रंगांचे फ्लॅट पॅचेस, आकाराचं सुलभीकरण (simplification), जाड तरीही सॉफ्ट आउटलाइन ही शैलीची वैशिष्ट्यं झाली. आकर्षक रंगसंगती, चित्ररचनेकडे असलेलं लक्ष या महत्त्वाच्या गोष्टी झाल्या. फ्लॅट पॅचेस करताना दोन रंग करकरीतपणे शेजारी शेजारी न लावता सहजपणे ब्लेंड केलेले दिसतात. केशरी, जांभळा, लाल, पिवळा, निळा असे ब्राईट कलरचे मोठे पॅचेस असले, तरी रंगसंगती आकर्षक असते, भडक नाही. व्हाइट स्पेसला महत्व दिलेलं असतं आणि रंगांचा वापर करून मुख्य विषयाला उठाव दिला जातो. पार्श्वभूमी हलक्या रंगात, जाणीव होईल इतपतच केलेली असते. हास्यचित्र असलं तरी मुळात हे चित्र आहे, हे भान कधी सुटलेलं दिसत नाही. चित्रातल्या सौंदर्याशी तडजोड केलेली दिसत नाही.

बदलत्या शैलीचं क्लासिक उदाहरण म्हणजे **‘सुदाम्याचे पोहे’** या पुस्तकाचं मुखपृष्ठ. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या पुस्तकाचं हे मूळ मुखपृष्ठ १९५७ चं, शैली जवळजवळ वास्तववादी आहे. तेच पुस्तक ऐंशीच्या दशकात नव्यानं आलं तेव्हा चित्रकाराच्या बदललेल्या शैलीत दिसलं.





बदलत गेलेली शैली

त्यांचं आवडीचं वाक्य आहे,
**‘हास्यचित्रांची वाट चित्रकलेतून जाते.’**

बुवा, नोव्हेंबर १९७३.



# अद्भुतरम्यता:

शि. द. फडणीस यांच्या हास्यचित्रांचं अतिशय महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातली अद्भुतरम्यता. (फॅन्टसी).

चित्रातले मूळ विषय आपल्या आजूबाजूचे असले तरी कल्पना भन्नाटपणे कुठेतरी पोचलेली असते. लहानगीची वेणी घालणारी आई किंवा पायऱ्या चढणारा तरुण - ही नेहमी दिसणारी दृश्यं. पण चित्रकाराची नजर आणि कल्पना त्यापुढे धावते आणि अशी चित्रं जन्माला येतात.

काहीवेळा वरवर साधी गंमत वाटणाऱ्या चित्रात वेगळाच अर्थ सामावलेला असतो. उदा. देवमाश्याने गिळलेली होडी हे चित्र. काहीवेळा लहानशा आनंदाकडे माणूस लक्ष देतो, पण त्याचवेळी एक मोठं संकट गिळत आहे हे त्याला कळतही नाही.


या हास्यचित्रांनी लोकांना हसवून त्यांच्या आयुष्यात आनंदाचे मौलिक क्षण दिले. **'शि. द. म्हणजे समाजाचा डॉक्टर'** - असा गौरव डॉ. एच. व्ही. सरदेसाई यांनी केला, तर खरोखरच एका मानसिक धक्का बसलेल्या स्त्रीला हसरी गॅलरी पुस्तकानं बाहेर काढलं. दिल्ली, पुणे, नाशिक येथे तर दोन - तीन रुग्णांनी डॉक्टरांच्या परवानगीने हसरी गॅलरी प्रदर्शनात येऊन उभारी मिळवली असे अनुभव आले.



सुसा, नोव्हेंबर १९६९.



मोहिनी, मे १९६७.




मॉन्ट्रियल, कॅनडा येथे प्रदर्शित.



पुणे प्रदर्शनातील चित्र, १९६६.


# प्रत्येक चित्रामागे एक विचार आहे

ही चित्रं नुसतीच गोड - आकर्षक नाहीत, तर प्रत्येक चित्रामागे काहीएक विचार आहे, ते स्वतंत्र साहित्य आहे. एक गोष्ट आहे. ती वाचकांपर्यंत पोहोचवायची आहे. त्यावेळी ते चित्र म्हणून उत्तम कसं होईल याकडे लक्ष आहे आणि हे होत असताना त्यामागचा विचार, विनोद हे हरवलेले नाहीत, तर ते अजून स्पष्ट झाले आहेत.

चित्रामागचा विचार पाहताना दिसते ती त्यांची जबरदस्त निरीक्षणशक्ती, त्या निरीक्षणातून पकडलेलं नेमकं मर्म, त्यातली विसंगती आणि ती विनोदाच्या भाषेतून मांडण्याचं सामर्थ्य! यातून त्यांनी स्वतःची समृद्ध चित्रभाषा निर्माण केली आहे!

ही गोष्ट कधी नुसतीच गंमत असते, कधी दांभिकतेवर बोट ठेवलेलं असतं, तर कधी सामाजिक वास्तव त्यातून पुढे येतं.

बाबांच्या शब्दांत - **'अर्थपूर्ण विसंगती हा विनोदाचा आत्मा आहे'.**



बुवा, नोव्हेंबर १९८८



मोहिनी जुलै १९६०



स्त्रीमुक्तीचे पंख आणि भारतीय संस्कृतीचे पाय

# फडणीस आणि मोहिनी दिवाळी अंक

१९५२ साली सुप्रसिद्ध उंदीर - मांजराचं चित्र मोहिनी दिवाळी अंकावर आलं. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे एखादी सुंदर तरुणी, हातात दिव्यांचं तबक असं काही नव्हतं. चक्क उंदीर - मांजर, बसस्टॉप हे विषय असलेलं विनोदी चित्र दिवाळी अंकासाठी घेणं ही संस्थापक संपादक अनंत अंतरकरांसाठी व्यावसायिक जोखीम होती. पण तेसुद्धा काळाच्या पुढे पाहणारे आणि हास्यचित्राची ताकद ओळखणारे संपादक होते. त्यांच्या पाठपुराव्यानेच हे आगळंवेगळं चित्र मुखपृष्ठावर आलं. त्यांचा अंदाज बरोबर ठरला. हे मुखपृष्ठ वाचकांनी डोक्यावर घेतलं. आजही शि. द. फडणीस म्हणजे उंदीर मांजराचं चित्र हे समीकरण रसिकांच्या डोक्यात कायम आहे.

अनंत अंतरकर हे त्यांची क्षमता सर्वप्रथम ओळखणारे संपादक होते. कोणतंही नाव, वलय नसताना अगदी तरुण वयात त्यांना हास्यचित्रासाठी प्रोत्साहन देणारे. फडणीस त्यांचं हे ऋण कायम मानत आले आहेत.

एक मोठा विक्रम म्हणजे १९५२ सालापासून सलग प्रत्येक वर्षी मोहिनीच्या दिवाळी अंकावर फडणीसांचं विनोदी चित्र आहे. तोच दिवाळी अंक, तोच चित्रकार. याहीवर्षी, २०२१ मध्ये ९६ वर्षीय फडणीसांचं नवं कोरं चित्र मोहिनीवर आलं आहे आणि ते सलग ७० वं मुखपृष्ठ आहे!


१९५२ चं ते गाजलेलं मुखपृष्ठ खऱ्या अर्थाने फडणीसांच्या कारकीर्दीला दिशा देणारं ठरलं. हेच आपलं क्षेत्र असा विश्वास तेव्हा निर्माण झाला. तोपर्यंत हा आपला फक्त छंद आहे, मनोरंजनाच्या पलीकडे यांत आव्हानात्मक असं काय असणार? असं वाटत होतं. पण अंतरकरांनी मांडलेला - पुण्यात कामासाठी, वास्तव्यासाठी येण्याचा प्रस्ताव फडणीसांनी मान्य केला.

हास्यचित्रांचं जग किती व्यापक आणि खोल आहे याची जाणीव ठळक होत गेली.




मोहिनी, ऑक्टोबर १९५२.

मोहिनी दिवाळी अंक २०२१



# कामांची विविधता:

मासिकांच्या मुखपृष्ठावर आलेली रंगीत मोठी चित्रं अनेक रसिकांच्या परिचयाची आहेत. **'फडणीस गॅलरी', 'हसरी गॅलरी'** ही पुस्तकं, तसंच प्रदर्शनातून ही चित्रं पाहायला मिळतात. पण त्याशिवाय खूप प्रचंड काम असं आहे की अनेक रसिकांना ते माहीत नाही.

त्यांच्या कामांची विविधता तरी किती असावी?

मोहिनीबरोबरच हंस, बुवा, किर्लोस्कर, मनोहर, प्रपंच, माणूस, तरुण भारत इत्यादी मराठी नियतकालिकांची आणि पुस्तकांची मुखपृष्ठं, बालसाहित्याची सजावट, आतली कथाचित्रं, नाटक सिनेमाच्या जाहिराती, काही क्लिष्ट विषय - उदाहरणार्थ बँकिंग, तत्वज्ञान, गणित, व्याकरण, औषधशास्त्र, व्यवस्थापन - सोपे करण्यासाठी केलेली प्रभावी हास्यचित्रं, बँका - कंपन्यांसाठी माहितीपत्रकं इत्यादी. हास्यचित्रांचं हे लवचिक माध्यम व्यावसायिक कामांसाठी चित्रकार फडणीसांनी प्रभावीपणे वापरलं.

सुरुवात प्रकाशन क्षेत्रात झाल्यामुळे सर्व प्रकारचं साहित्य त्यांनी सचित्र केलं. त्यात गंभीर साहित्यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर, महादेवशास्त्री जोशी, गो. नी. दांडेकर, ना. सी. फडके, दि. बा. मोकाशी, वसुंधरा पटवर्धन अशा अनेक साहित्यिकांसाठी चित्रं केली.

विनोदी लेखकांमध्ये श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे, द. मा. मिरासदार, व. पु. काळे, शकुंतला फडणीस, दिलीप प्रभावळकर, मंगला गोडबोले अशा अनेकांसाठी चित्रं केली.




चिमणरावांचे चऱ्हाट - चिं. वि. जोशी




पूर्णामायची लेकरं, गो. नी. दांडेकर









अपूर्वाई, पु. ल. देशपांडे.


हांक
-ना.सी.फडके


S. PHADNIS


दिसायला सोपं, करायला अवघड असं काम म्हणजे पाठ्यपुस्तक मंडळासाठी सलग पंचवीस वर्षं केलेली गणिताची पुस्तकं. याचं महत्त्व म्हणजे ही नुसती सजावट नव्हती, तर वाचू न शकणाऱ्या मुलांसाठी चित्रांच्या भाषेतून गणित समजावून सांगायचं होतं. आजही अनेक तरुण आठवण काढतात, ते त्यांच्या बालपणात गणित विषय रंजक करून सांगितला याची.




७० च्या दशकात काही काळ त्यांनी मोठे इंजिनियरिंग उद्योग, बँका, औषध कंपन्या यांच्यासाठी माहितीपत्रकं डिझाइन करणं आणि छापून देणं हे व्यवसायाचं स्वरूप यशस्वीपणे हाताळलं. हे सगळं करत असताना त्यांना हास्यचित्रांचं सामर्थ्य जास्तच लक्षात येऊ लागलं.

अशी आव्हानात्मक, बौद्धिक कस पाहणारी, ज्यात काही विचारपूर्वक उपयोजन आहे अशी हास्यचित्रांची वाट त्यांना अधिकाधिक आवडत गेली. विविध विषय हाताळले तरी मुख्य ओळख हास्यचित्रकार शि. द. फडणीस हीच राहिली.








COMPACT AND SAFE

नायक्रोम इंडिया लिमिटेड


**‘फडणीस गॅलरी’** - पुस्तकातून







**‘रिटायर इन हार्मनी’** - केंद्र सरकारतर्फे प्रकाशित पुस्तकातून.







**‘माणूस’** - २४ सप्टेंबर १९७७

# शब्दविरहित चित्र

शब्दविरहित चित्र ही शि. द. फडणीसांची खासियत आहे. ही चित्रं भाषा, प्रांत, वय, संस्कृती या सर्व सीमा ओलांडून जातात. यामुळे चित्रं रसिकांपर्यंत सहजपणे पोचली. **'हसरी गॅलरी'** प्रदर्शनं देश - विदेशात गाजली. लोकांनी रांगा लावून पाहिली.


कोणत्याही शब्दांचा आधार नसल्याने ती भारतातल्या सर्व प्रांतांत - तसंच कॅनडा, जर्मनी येथील नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाली आणि त्यांचा गौरवही झाला. १९९७ साली अमेरिकेत मायामी युनिव्हर्सिटीत **'चित्रहास'** हा कार्यक्रम - म्हणजे प्रात्यक्षिकासह व्याख्यान झालं, तेही सगळयांना आवडलं. २००६ साली फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी इथे मॅक्समुल्लर भवनतर्फे आयोजित निमंत्रित व्यंगचित्र प्रदर्शनात त्यांच्या हास्यचित्रांचा समावेश होता.


एक मजेशीर गोष्ट नोंदवावीशी वाटते, ती म्हणजे त्यांच्या चित्रांत माणसांबरोबर मोठ्या प्रमाणावर प्राणी दिसतात. सिंह, बैल, उंदीर, मांजर, साप, म्हैस, बकरा, हत्ती, कोंबडी, मासा असे अनेक. या शब्दविरहित प्राण्यांना घेऊन ही चित्रं वारंवार खुलली आहेत!



तरुण भारत, नोव्हेंबर १९६८, फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी येथे प्रदर्शित - २००६.

मोहिनी, नोव्हेंबर १९९५





मोहिनी फेब्रुवारी १९७०

# अश्लीलतेला थारा नाही

बाबांनी एवढी विनोदी चित्रं केली, पण त्यात कधीही अश्लीलतेला थारा नव्हता. शृंगार वर्ज्य नव्हता, पण उत्तम अभिरुचीचा आणि सभ्य विनोद हे त्यांचं कायम वैशिष्ट्य राहिलं. न्यूड पेंटिंग हा एका चित्राचा विषय असूनसुद्धा विनोदाचा दर्जा अभिजात राहिलेला दिसतो.




मोहिनी, नोव्हेंबर १९७९

# चित्रकला क्षेत्रासाठी कायदेशीर लढाई

आज चित्रकला आणि प्रकाशन क्षेत्रात काही जणांना माहीत असलेली चित्रकार फडणीसांची कामगिरी म्हणजे कॉपीराइट कायद्याची सर्वांना करून दिलेली जाणीव.

१९६०-६२ च्या सुमारासची ही गोष्ट आहे. आपल्याला कॉपीराईटचा अधिकार आहे हे चित्रकारांनाही माहीत नसे. अनेकदा त्यांची चित्रं परस्पर इतर प्रकाशक वापरत. त्याबद्दल चित्रकाराला मोबदला तर सोडाच पण परवानगीही विचारली जात नसे. आणि याची आवश्यकता आहे, हे महत्त्वाचं आहे याची जाणीव कोणालाच नव्हती.

बाबांच्या बाबतीत असं झालं की त्यांची चित्रं त्यांना न विचारता दुसऱ्या सवंग आणि चावट मासिकांवर परस्पर वापरली गेली. हे कळल्यामुळे यासाठीचा कायदेशीर मार्ग काय आहे हे तपासणं जरूरी झालं आणि कायद्याप्रमाणे चित्रांचा हक्क हा चित्रकाराकडेच असतो हे त्यांनी आग्रहानं प्रतिपादन केलं. काहीवेळा कायदेशीर नोटीसही पाठवावी लागली. नंतर हळूहळू ही माहिती सर्वांना झाली. आताचे अनेक चित्रकार त्यांना यासाठी धन्यवाद देतात.

कलाप्रदर्शनावरचा करमणूक कर हा हसरी गॅलरी प्रदर्शनाच्या निमित्ताने समोर आलेला प्रश्न.  तमाशा, नाटक, जादूचे प्रयोग, संगीत इत्यादींना नसलेला करमणूक कर कलाप्रदर्शनाला मात्र होता. सहा वर्षं सरकारदरबारी पाठपुरावा करून हा कर रद्द करून घेण्यात बाबांना यश आलं. त्याचा सर्वच दृश्यकलाकारांना उपयोग होत आहे.




# आधुनिक दृष्टिकोन


अलीकडे बाबांनी काम कमी केलं आहे. अगदी थोडं, स्वतःला आवडेल एवढंच काम ते करतात. आजही, ते चित्रांसंदर्भातली काही कामं सतत करत असतात.

चित्रांच्या बाबतीत त्यांनी नेहेमी आधुनिक दृष्टिकोन ठेवला. स्वतःला सतत प्रयोगशील ठेवलं. विषय काळाशी मिळते - जुळते घेतले. शैली बदलत गेली. पात्रांच्या पेहरावातही आधुनिकता येत गेली. चित्रात पूर्वी टांगा, शेगडी, पत्रपेटी होती. नंतर गाड्या, स्कूटर, गॅस सिलींडर, मोबाईल आले. बाळबोध चित्रण त्यांच्या चित्रांत कधीच दिसत नाही.

नवीन गोष्टींबद्दल सतत कुतूहल. याचमुळे आता कॉम्प्यूटरही वापरतात. हे टूल जाणकारीने अवश्य वापरावं असं त्यांचं मत आहे.



मोहिनी, नोव्हेंबर २००८



मोहिनी, नोव्हेंबर २०२०



हसरी गॅलरी प्रदर्शन, पुणे २००४

शाळा - कॉलेजमध्ये असल्यापासून मी त्यांना गणित पुस्तकाच्या आणि इतर कामात, हसरी गॅलरी प्रदर्शनात मदत करत आले. जवळून त्यांचा नीटनेटकेपणा बघितला, अनुभवला, जमेल तितका घेण्याचा प्रयत्न केला.

मी अप्लाइड आर्टसाठी प्रवेश घेतल्यानंतर मला हे कर ते कर असं कधी सांगितलं नाही. पण बेसिक ड्रॉइंगच्या टिप्स इतक्या छान दिल्या, की त्या कायमच्या लक्षात राहिल्या. माझ्या काही असाइन्मेंट्स त्यांनीच जपून ठेवल्या.

मुंबईत एजन्सीचा अनुभव घेऊन मी पुण्यात स्वतःचं काम सुरू केलं. तेव्हाही त्यांच्याकडून मला मोलाचं मार्गदर्शन मिळालं आणि त्यामुळे मोठी कामं मी एकटीच्या जबाबदारीवर घेऊ शकले.

## जीवनाकडे बघण्याची निकोप दृष्टी

फडणीसांचे चाहते म्हणतात की त्यांचा विनोद निखळ हसवणारा आहे, कोणाला बोचकारणारा नाही. मला वाटतं, जसा त्यांचा स्वभाव आहे, निर्मळ, शान्त, आनंदी, तसाच त्यांचा विनोद आहे. नित्य ध्यान, प्राणायाम, योगासनं यांचा त्यात वाटा आहे.

त्यांच्या मिश्किल, ऋजू स्वभावानुसारच ते सगळ्यांशी बोलतात - वागतात. अनेक प्रकारचे कलाकार त्यांना भेटायला येतात. आलेली व्यक्ती कलाकार आहे याचा ते आदर करतात. सर्व दृश्यकला एकमेकींशी जोडलेल्या आहेत असं त्यांचं मत आहे.

हास्यचित्रकलेच्या क्षेत्रात परिपूर्णतेचा ध्यास धरत त्यांनी झोकून दिलं. यश, प्रसिद्धी, याकडे त्यांचं लक्ष नव्हतं. ते काम करत राहिले. या गोष्टी त्यांच्याकडे आपोआप आल्या. रवी परांजपे फाऊंडेशनच्या **'कृ. रा. परांजपे गुणीजन कला पुरस्कारा'** सह अखिल भारतीय पातळीवरचे पुरस्कार - मुंबई, रायपूर, कलकत्ता, बंगलोर इथेही मिळाले. मात्र रसिकांचं अलोट प्रेम पुरस्काराइतकंच त्यांना महत्त्वाचं वाटतं.


हास्यचित्रांचं जग खूप मोठं, विविधांगी आहे. ती कधी अंतर्मुख करतात तर कधी जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन देतात. बाबा म्हणतात, **'हास्यचित्रांचं नातं विद्वत्तेपेक्षा शहाणपणाशी अधिक आहे'.**

त्यांचं एक चित्र आहे - **'आयुष्यातल्या काट्यांकडे लक्ष न देता आनंदाने फुलाकडे बघा'** - असं सांगणारं. तेच त्यांच्याही जीवनाचं सार आहे!





मोहिनी नोव्हेंबर १९५४, कॅग अवॉर्ड, मुंबई.



रसिक, नोव्हेंबर १९७६



## - शि. द. फडणीस

- जन्म. २९ जुलै १९२५, भोज, जि. बेळगाव.
- चित्रकला उच्च शिक्षण: जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई.
- व्यंगचित्रकार म्हणून कारकीर्द आणि वास्तव्य पुणे येथे.

मोबाईल: 09822893663

## पुस्तके:

हसरी गॅलरी.
मिस्किल गॅलरी.
फडणीस गॅलरी.
रेषाटन - आत्मवृत्त.
छोट्यांसाठी चित्रकला भाग एक आणि दोन.
सर्व पुस्तके: ज्योत्स्ना प्रकाशन

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged. All images © Mr. S. D. Phadnis

“फडणीसांची चित्रे मी जेव्हा माझ्या हाताने चितारली तेव्हा या चित्रकाराची रेषेवरील हुकमत मला विलक्षण आवडली. आकाशातून खाली सरळ रेषेत झेपावणारी घार एका अचूक क्षणी आपले लक्ष्य साध्य करते आणि तितक्याच सुसाट वेगाने पण सफाईदारपणे पुन्हा आकाशात झेपावते, तशी फडणीसांची रेषा अनेक दिशांनी त्यांच्या चित्रातून आत्मविश्वासपूर्वक झेपावणाऱ्या घारीसारखा स्वैर संचार करत असते. व्यंगचित्रे चितारताना त्यांना हा घारीचा आनंद मिळत असावा असा माझा कयास आहे.”

*- नामवंत व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर.*

## वयाच्या सीमा ओलांडणारी चित्रं

“फडणीसांचं काम त्यांच्या कालखंडाच्या पुष्कळ पुढचं काम आहे. त्यांच्या कार्टूनमध्ये शब्द नाहीत. त्यांची ड्रॉइंग केवळ अप्रतिम आहेत. त्यांच्या चित्रांतून चेहऱ्यावर उमटणारं हास्य हे वयाच्या सगळ्या सीमा ओलांडतं. एवढं अद्भुत काम अजूनही सर्व भारतीयांच्या समोर आलेलं नाही!”

*- इंग्रजी दैनिकांतून परिचित झालेले,*
*मुंबईचे ख्यातनाम राजकीय व्यंगचित्रकार श्री. मंजुल.*



It was 1944. A young lad from a middle-class family of Kolhapur with a passion for art, had a single-minded resolve to study at the prestigious Sir J. J. School of Art in Mumbai, after matriculation.

During childhood, he was highly influenced by attractive, pictorial publications. He had spent hours with his friends, sketching at various locales of Kolhapur. He had also won three state level awards in the intermediate drawing grade exam under the tutelage of his art teacher, Shinde Master.

His family had no idea about art education. His older brother, Bapu, convinced the family, and the young man soon reached the distant, unfamiliar, metropolis of Mumbai.

**He is my father S. D. Phadnis!**
Affectionately called Baba by my sister Leena and I.

**- Roopa Deodhar.**
roopadeodhar1@gmail.com

- Translated by: **Nandini Bajekal**
bajekaln@gmail.com



The determination with which he came to Mumbai, saw him complete his studies in commercial art in 1949 with flying colours, after which he started working in this field. He began cartooning alongside as a hobby.

Over the years, he made it his own, nurtured it and raised it to new heights. His diverse creations have demonstrated that cartoons are not just images giving momentary joy, but indeed an art form to be taken seriously!

He says**, "If the art of cartooning had not challenged my creativity as an artist, I would have pursued painting".**

When his works spanning several decades are carefully observed, the reasons behind the essence of their beauty and simplicity are revealed.

## Command of drawing and anatomy:

What impresses me most about Baba's works is his command of drawing, thought process behind every picture, and fantastic imagination.


To bring his imaginary characters to life on paper, he has turned and twisted them in various postures, without appearing grotesque.

His favourite line is, 'The path of a cartoon emerges from the grammar of drawing'.

## Innumerable sketches:

To get the right composition, form, and expression of his characters, he makes innumerable pencil sketches. He runs them past my mother and us, to ascertain that they are befitting. The charm, rhythm and graceful movement seen in his human and animal figures is due to his diligent work style.





I clearly remember the umpteen sketches he made, to get the innocent expression of the stealthy cat in the cartoon 'The cat with the milk vessel'.

Once satisfied with the sketch, he makes thumbnails for colour schemes. He then, taking great pleasure, paints the artwork in the correct size.

Through all these years, he has meticulously completed every job. Punctuality is his hallmark, an attribute seldom seen in the field of art. His artworks are always ready, prior to the date of submission.

## Growth in his style:

Over the years, interesting changes have taken place in his style. His works of the fifties and sixties were semi-realistic. He gradually developed a style of his own.

Simplification in form, flat patches in colouring style, thick yet soft outlines became the characteristics of his work.

As his style evolved, a few important changes took place. While paying attention to composition and giving importance to white space, he started juxtaposing patches of colour to blend, rather than to appear sharp. Harmonious colour schemes and subtle background colours brought finesse to his works. He started using colours to highlight the main subject, enhancing the beauty of the artwork.

A befitting example is the book cover of 'Sudamyache Pohe', authored by Shripad Krishna Kolhatkar. His original design from 1957 is semi-realistic. When it was republished in the eighties, he redesigned the cover in his classic style.

## Fantasy:

An important feature of his cartoons is fantasy.

Though the subject matter comes from our immediate surroundings, Baba's fanciful imagination stretches way beyond. A common sight sparks his creativity and amazing creations are born!

The cartoon showing a large fish swallowing a boat, may appear simple, but has a deeper meaning. A person engrossed in enjoying a joy of life may be unaware of the lurking danger waiting to gulp him.

Dr. H. V. Sardesai has honoured him by saying, "Phadnis is a social doctor". Rightly so, the book 'Laughing Gallery' has given solace and enabled a lady to recover from mental shock.

Some patients who visited the 'Laughing Gallery' exhibition with permission from the doctors, had an energizing experience!


## Thoughts behind every illustration:

His illustrations are not just sweet and attractive. There is a deep thought behind each one of them.

An illustration is a pictorial narrative. It could be an amusing anecdote or one highlighting a falsehood or a social reality. At all times, his focus has been on making it an attractive visual whilst accentuating the thought and humour behind it.

The success of his enriching visual language can be attributed to accurate observation and his ability to grasp the ludicrousness in a situation.

According to him, "Meaningful absurdity is the soul of humour".



## Phadnis and Mohini magazine's Diwali Edition:

In 1952, the celebrated 'Cats and Mice' cartoon was published as the cover of the Mohini Diwali edition. This illustration was completely different from the norm of those days. Founder editor Anant Antarkar had taken a commercial risk printing a cartoon, instead of a cliched, beautiful damsel holding a lamp. He was a visionary editor and had anticipated the potential of cartoons. With his personal follow up, this unusual picture saw itself as a magazine cover. Antarkar's foresight proved to be right. The readers adored it!



**Since then, Baba's cartoons have been gracing the cover of every Diwali edition of Mohini. This year, in 2021, Mohini has it's seventieth brand-new cover design, done by the ninety-six years old artist!**

Even today, readers associate the 'Cats and Mice' cartoon with him. He is ever grateful to Anant Antarkar for recognizing his potential and giving wings to his untapped talent when he was starting out, despite his lack of name and fame.

With this pathbreaking work, began a new era in my father's career. Till then, cartooning was his hobby. But now, it had opened a new vista. He accepted Antarkar's suggestion and shifted base to Pune.



## Diversity in his works:



Viewers are familiar with his cartoons through various magazine covers, as well as his books and exhibitions.

However, he has, to his credit, a diverse plethora of work. Other than Mohini and other periodicals, his cartoons have appeared on book covers and as illustrations for children's literature, company brochures, advertisements for plays and movies, and many more.

They have enhanced and simplified complex subjects such as banking, technology, medicine, and management. He has effectively used cartoons for the commercial world.



Having started his career in the publishing industry, he has done illustrations for fiction and nonfiction writers like Swatyantraveer Savarkar, Mahadev Shastri Joshi, G. N. Dandekar, N. C. Phadke, D. B. Mokashi, Vasundhara Patwardhan etc., as well as for humour writers like Shripad Krishna Kolhatkar, C. V. Joshi, P. L. Deshpande, D. M. Mirasdar, V. P. Kale, Shakuntala Phadnis, Dilip Prabhavalkar and Mangala Godbole.

For twenty-five consecutive years, he has illustrated math books for the Maharashtra State Bureau of Textbooks. The simple but difficult to depict illustrations have helped children to easily grasp the concept. Even today, several youths remember their math text books for the educative and captivating illustrations.



During the seventies, he designed and printed brochures for engineering and pharmaceutical companies, and banks. While doing so, he became especially aware that cartoons are powerful communicators.

Although he has done various types of designing jobs, he is widely recognised as the accomplished cartoonist S. D. Phadnis!



## Captionless Cartoons:

Captionless cartoons are Baba's forte. They transcend barriers of language, culture, region, or age. His cartoons have been published and highly appreciated in various regions of India and in countries such as Canada, Germany, and USA.

His lecture-demonstration, 'Chitrahaas', organised by Miami University in 1997, was also well received. In 2006, his works were displayed in an 'invitees only' cartoon exhibition organised by Max Mueller Bhavan, in Frankfurt, Germany.

The 'Laughing Gallery' exhibitions have been a great success in India and abroad, where people have queued up to watch it.

An interesting fact is that, along with humans, animals too, are protagonists in his cartoons. Lions, bullocks, mice, cats, snakes, goats, elephants, hens, fish have all enlivened his works.

A distinguishing feature of his cartoons is the tastefully portrayed humour without the slightest hint of vulgarity. One of his cartoons is about a nude painting, but he has depicted it with great poise.

## Fight for the legal rights of the art fraternity:

The untiring work done by him to create awareness about the copyright law is known to many in the art and publishing fields.


In the early sixties there was little to no knowledge of copyright law amongst artists. Several times, their works were copied and published without being paid, or their permission sought. Artists did not recognise the necessity and importance of protecting their artworks from infringement.

One of Baba's cartoons was reproduced in an indecent magazine, without his knowledge. When he became aware of this, he sought legal opinion and proved that, by law, an artist has exclusive rights over his artwork.

Many times, he has had to send legal notices to offenders. With his persistent efforts, awareness spread. Many artists are thankful for his important contribution.

Another feather in his cap is the exemption of entertainment tax on art shows. The issue came up due to the 'Laughing Gallery' exhibition. Although entertainment tax was exempted from tamasha, plays, magic and musical shows, it was levied on art exhibitions. After six long years of his relentless perseverance with the government authorities, his efforts bore fruit. The tax was waivered. Visual artists have benefited from this since then.





## Modern Outlook:

Due to a modern approach towards art, he has chosen contemporary topics and has often experimented, keeping abreast of the times.

In the past, he has depicted a horse-drawn cart, a postal letterbox, a mud cooking stove, etc. His later works have modern day vehicles and gadgets. The attire of his characters too has changed accordingly.

Presently, Baba has reduced his workload, but keeps himself busy with art-related activities. He takes up select jobs that interest him.

He is a keen learner and has welcomed the opportunity to use the computer. He considers it as a magic tool!

## Invaluable Guidance:

From my school days, I have been helping him with his designing jobs and the 'Laughing Gallery' exhibitions. I have gained immense experience from his methodical and orderly approach.

While I was pursuing my studies in Applied Art, he gave me invaluable tips on drawing but did not interfere with my studies. He has still preserved some of my assignments.

After gaining advertising agency experience in Mumbai, I returned to Pune to work on my own. Baba's worthwhile advice helped me work independently on major jobs.

## Cheerful outlook towards life:

His fans say that his humour is pure and cheerful. I think it is just like him; gentle, calm, happy and positive! Daily practice of yoga, pranayam and meditation have played a part.


Baba has a straight-forward and humble personality. His interaction with everyone is full of light-hearted humour. Artists from various fields visit him regularly with sincere admiration. He is ever respectful of the fact that they are all artists. He firmly believes that that all visual arts are interconnected.

His constant focus has been on seeking perfection in his work, without chasing name and fame. They have easily come to him due to his dedication towards art. Other than the prestigious 'K. R. Parajape Gunijan Kala' award by 'Ravi Paranjape Foundation', he has won several national level awards. The love he receives from his fans is equally important to him.

He believes that cartooning as an art form, is vast and multifaceted. Sometimes cartoons make us introspective, at other times they give us a perspective on looking at life.

He says, "Humour is related more to wisdom, rather than intellect".

One of his illustrations appropriately conveys the essence of his life,
'Ignore the thorns of life and behold the flowers that bloom!'




## - S. D. Phadnis

- Born: 29 July 1925, Bhoj, Dist. Belgaum
- Art Education: Sir J. J. School of Art, Mumbai
- Cartoonist
- Lives and works in Pune

Mobile: 09822893663
sd_phadnis@yahoo.com

## Books:

Laughing Gallery
Miskil Gallery
Phadnis Gallery
Reshatan – Autobiography
Painting For Children: Part 1 and 2
Publisher: Jyotsna Prakashan
jyotsnaprakashan@gmail.com



All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged. All images © Mr. S. D. Phadnis

"I have been awestruck by the quality of Phadnis's line work while replicating his drawings. Just as an eagle accurately swoops down to its target with full concentration, and soars back to the skies, Phadnis's lines confidently transverse through pictorial space. I believe, he must be experiencing the same joy, like the eagle, while drawing his cartoons."

***- Well-known cartoonist Mangesh Tendulkar***

## Cartoons that break the barriers of age.

"Phadnis's work is futuristic. His cartoons are captionless. His drawings are outstanding. His works bring a smile on the faces of people of all ages. These incredible works have yet to gain wide recognition in India!"

***- Mumbai based renowned political cartoonist Mr. Manjul who gained recognition through English dailies.***

# द रवी परांजपे फाउंडेशनचा वृत्तांत

## नूतन वर्ष २०२२ वृतांत।

**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा।**

'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' नवीन वर्षात काय विशेष ह्याची उत्सुकता अनेक चाहत्यांना आहे आणि म्हणूनच नवीन वर्षाची सुरवात काही खासम् खास उपक्रमांनी करून चाहत्यांना खूष करायचे ठरविले आहे. काही खास मिळवायचे असेल तर जरूर हा'द रवी परांजपे फौंडेशन' वरील लेख शेवटपर्यंत वाचा. नवीन वर्षात अगदी खूष व्हाल ह्याची खात्री आमची.

कोरोना धुमाकूळ काही संपत नाहीये. २०२० पासून फौंडेशनतर्फे जोमाने उपक्रम जाहीर केले जात आहेत आणि कोरोना प्रादुर्भाव वाढला की आर्ट गॅलरीत आयोजित केलेले कार्यक्रम रद्द करावे लागत आहेत. अर्थात हा निर्णय सर्वांच्या सुरक्षिततेच्या हितानेच घेणे उचित वाटले. 'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' मग ऑनलाइन उपक्रम २०२०- २०२१ मध्ये राबविले गेले आणि त्यांना मिळालेला प्रतिसाद हा आमच्या अपेक्षेपेक्षा फारच उत्तम होता. अर्थात चित्रकला ही कला प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा विषय आहे. कितीही झाले तरी ऑनलाइन संपर्काने ह्या कलेची लज्जत पूर्ण अनुभवता येत नाही. नूतन वर्षाकरीता भरगच्च कार्यक्रम प्रत्यक्ष आणि शिवाय ऑनलाइन असे वर्षाचे कॅलेंडर आजच जाहीर करायचे होते. पण ओमीक्रोन नामक नवीन कोरोना विषाणू डोके वर काढू लागला आहे आणि 2022 च्या सुरवातीला परत एकदा सर्व ठरविलेले सर्व नियोजित उपक्रम वेगळ्या पद्धतीने सादर करायचे असा नवीन निर्णय 'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' घेण्यात आला आहे.

आता हे खासम् खास काय ? ह्याची उत्सुकता आपल्या सर्वानाच निर्माण झाली आहे ना? मग पुढे वाचा तर....

'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' सर्वप्रथम website एका नव्या नामकरणाने व नव्या छटांमध्ये सादर केली जात आहे. आता http://www.raviparanjape.org/ ह्या नवीन website पत्त्यावर आपण सर्वजण आमच्या संपर्कात राहू शकता. ह्या website चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' प्रसिद्ध केलेली सर्व प्रकाशित पुस्तके (छापील पुस्तके व इ-book) आणि ज्येष्ठ आर्टिस्ट श्री रवी परांजपे सरांची तुमच्या आवडत्या शैलीतील चित्रे (छापील प्रती) तुम्ही थेट आमच्या website वरून विकत घेऊ शकता. सर्व वस्तू अर्थातच अत्यंत माफक व सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत.आपली ऑर्डर नोंदवण्याचे व पैसे भरण्याचे अत्यंत सुलभ पर्याय website वर उपलबद्ध आहेत त्याचा जरूर लाभ घ्यावा व आपल्या आवडत्या पुस्तकांच्या व चित्रप्रतीच्या खरेदीची नोंदणी करून टाका.

आपण केलेल्या कुठल्याही खरेदीतून 'द रवी परांजपे फौंडेशनला' होणारा नफा हा केवळ गुणवंत व गरजू कलाकारांच्या उन्नत वाटचालीसाठी वापरण्यात येतो.'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' राबविण्यात आलेले सर्व उपक्रम हे कायमच 'निशुल्क' तत्वावर

कलाकारांना व उपस्थित हौशी चाहत्यांसाठी आयोजित केले गेले. भविष्यातही 'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' हाच नेहमी प्रयत्न राहील. http://www.raviparanjape.org/

ह्या आमच्या website वर 'The Visual Melody' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. दिग्गज, जेष्ठ भारतीय चित्रकारांवर ह्या त्रैमासिकात उत्तम लेख मराठी व इंग्रजीतून 'The old master series ' ह्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित प्रसिद्ध केले .स्वतः ज्येष्ठ आर्टिस्ट श्री रवी परांजपे सर ह्या त्रैमासिकात स्वतःच्या शैलीत लेखन करतात ते लेख वाचणे हे नवोदित किंवा कुठल्याही काळातील चित्रकारांना वाचन पर्वणी ठरू शकते. भविष्यातही वेगवेगळ्या कलात्मक कल्पनांवर आधारित त्रैमासिक प्रसिद्ध केले जाणार आहे.सर्वात महत्वाचे हे त्रैमासिक मोफत उपलब्ध आहे. आपली प्रत मिळवण्यासाठी आमच्या website वर भेट देऊन आपले नाव नोंदवा व मोफत त्रैमासिकांचा आस्वाद घ्या. ह्या website वर पूर्वीची त्रैमासिकेही उपलबद्ध आहेत.

आता अजून काही खासम् खास घोषणा राहिली आहे का? हो तर , तुम्ही शांतपणे सर्व काही शेवटपर्यंत वाचलेत मग नूतन वर्षाची एक धमाकेदार भेट आपल्याला द्यायलाच हवी. ज्येष्ठ आर्टिस्ट' श्री रवी परांजपे 'सर ह्यांच्या जीवनावर आधारित 'द रवी परांजपे फौंडेशनतर्फे' बनविण्यात आलेली चित्रफीत आता आजपासून 'you tube' वर उपलब्ध आहे.श्री रवी परांजपे सरांनी २०१० साली आपल्या 'ब्रश मायलेज' (छापील पुस्तक) ह्या प्रकाशित केलेल्या आत्मकथेतून आपल्या सर्वानाच त्यांच्या आयुष्यातील अनेक रंगबिरंगी प्रसंगांचे दर्शन घडविले आहे. ह्याच जीवन प्रवासावरील कथेवर आधारित 'ब्रश मायलेज'ह्या जीवनपटाची निर्मिती करण्यात आली आहे. चित्रकाराच्या आयुष्यात झालेले चढउतार कोऱ्या कॅनव्हासवर रंगांच्या साहाय्याने साकारणे, मग ते शब्दबद्ध करणे आणि अखेर दृश्यकलेतून बोलपटाच्या आधाराने जनतेसमोर सादर करणे हा ही एक वेगळा प्रवासच आहे.

नवीन website वर चित्र, पुस्तके, चित्रफीत ह्या माध्यमातून सर्व चाहते 'श्री रवी परांजपे सरांच्या' सर्व शैलींचा आस्वाद घेऊ शकतील. ह्या सर्व संकलित माहितीचा मोफत अथवा सशुल्क पद्धतीने जरूर लाभ घ्या ही नम्र विनंती.

सौ आशा अग्निहोत्री

(प्रति द रवी परांजपे फाऊंडेशन)

# Glimpses of past and future activities of 'The Ravi Paranjape Foundation.'

***Happy new year to all of you.***

*http://www.raviparanjape.org/*

*This is the new address of 'The Ravi Paranjape foundation' website. Now you can contact us and buy books written by 'Artist Shree Ravi Paranjape Sir' and even paintings , prints designed by 'Artist Shree Ravi Paranjape Sir'. Everything can be ordered online using easy payment options given on our new website.*

*Our all latest and past issues of 'Visual Melody' magazine are available for free downloads on this new website. This magazine is always designed on different themes. You can enjoy informative articles written by 'Shree Ravi Paranjape Sir' in this magazine. This magazine is very educative for anyone who is interested in learning about other veteran/ senior / well known artists art in depth.*

*We are happy to announce another big news on this New Year ....*

*The film 'Brush Mileage' made by 'The Ravi Paranjape Foundation' based on the life of veteran artist 'Shri Ravi Paranjape' Sir is now available on 'you tube' from 1st January 2022 for viewing.*

*From 2020 March due to Corona and now with current new variant Omicron we are continuously making changes in our yearly programme calendar. This is of course for everyone's safety. All our programs are mostly free for visitors. The profit made after the sale of books, prints, paintings is always used for the talented and upcoming painters' welfare. We also offer our art gallery at 'no fee basis' to upcoming artists to showcase their art work on few particular days of the year as and when possible.In the last two difficult years we always followed government Rules while conducting programs in our art gallery. Our all online programs were also unexpectedly superhit in last two covid years.Our all programs will be announced time to time on our website and through all social media handles in near future.*

*So Stay tuned with us through social media and through our website and get to know more about our future online or live programs.*

*Thank you*

*Asha Agnihotri*

*(For 'The Ravi Paranjape Foundation')*

*Email: abhijatkala@gmail.com*

Address: RAVI PARANJAPE FOUNDATION FOR ART, Pune
1-Rutica Apts., 1098/5-A Model Colony, Shivajinagar, Pune, Maharashtra 411016
Open : 10am Closes : 7PM

For latest events please visit : https://www.facebook.com/www.theraviparanjapestudio
Phone: Shree Sanjay Lopes: +91 940-543-6175



*Compliments from*
*RAVI PARANJAPE FOUNDATION FOR ART, Pune*

*For latest events please visit : https://www.facebook.com/theraviparanjapestudio*
*Email: abhijatkala@gmail.com*